## रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ३२/२०१७ मधील नि.क्रं.०५ वर आदेश

**०१**. वादीने हा अर्ज दिवाणी प्रकिया संहितेचा आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

**०२.** वादीचे कथन असे आहे की मौजे तळवडे, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथील गट नंबर १८१/अ क्षेत्र् १ हेक्टर ०.०५ आर यांसी चतुःसिमा –

पूर्वस – गट नंबर २५२ ची मिळकत

पश्चिमेस – मौजे आंबा शीव.

दक्षिणेस – गट नंबर १८१ पैकी प्रतिवादीची सुमारे १७ गुंठेची मिळकत व पलिकडे गट नंबर १८० व १७६ ची प्रतिवादी यांची मिळकत.

उत्तरेस – गट नंबर १९२ व १९३ ची मिळकत.

येथूनपुढे या मिळकतीस दावा मिळकत असे संबोधले आहे. या मिळकतीचा वादी कब्जेदार असल्याचे कथन केले आहे.

**०३.** जुना गट नंबर १८१ मधील १७ आर जमिन प्रतिवादीने दिनांक २०.०६.२००८ रोजी मूळ मालक सुभाष सिताराम कांबळे यांचेकडून खरेदी घेतली आहे. जुना गट नंबर १८१ मधील उरलेले क्षेत्र वादीने दिनांक २७.०८.२०१४ रोजी सुभाष सिताराम कांबळे, सावळाराम पांडुरंग कदम, बबन सिताराम कांबळे व राजश्री सुभाष कांबळे यांच्याकडून खरेदी केली आहे. वादमिळकत वादी अकृषीक करुन घेत आहेत. प्रतिवादी हे गट नंबर १८१/अ चे दोन भाग पाडून वादीला अडथळा करत आहेत व स्वतःच्या मिळकती गट नंबर १८१/ब मधील प्लॉटचे भाव वाढविण्यासाठी वादीला त्रास देत आहेत.

**०४**. प्रतिवादींनी या कामी हजर होवून आपले म्हणणे सादर केले आहे.प्रतिवादींनी कथन केले आहे की वादीला आपली स्वतःची जमिन कोठे आहे आणि त्याच्या हददी कोणत्या आहेत याची कल्पना नाही. वादीची जमिन प्रतिवादी यांच्या जमिनीपेक्षा १७ ते २० फुट सखल भागात आहे त्यामुळे प्रतिवादींनी वादीच्या जागेत घुसण्याचा प्रश्नच उदभवत नाही. प्रतिवादींनी त्याची जमिन मौजे तळवडे येथील गट नंबर १७६/ब, १८०/ब, १८१ पैकी १७ आर म्हणजेच गट नंबर १८१/ब व गट नंबर १८३(एकूण क्षेत्र् १ हेक्टर ७४ आर ) या क्षेत्राचे २७.४०० चौरस

मिटर बिगरशेती मंजूर करुन घेतली. रितसर फाळणी पत्रक मंजूर झाले आहे व ले–आउट प्लॅनप्रमाणे प्रत्येक प्लॉटला वेगळा ७/१२ प्रतिवादीच्या नावे तयार झाला आहे. प्रतिवादी हा आपली बिगर शेती केलेल्या जागेचे सपाटीकरण करत आहेत. त्यांनी वादीच्या जमिनीत अतिक्रमण करण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

०५. अर्ज व त्यावरील म्हणणे, दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता माझ्या विचारार्थी खालील मुददे निघतात. त्यावरील माझा निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे

| अ.क्रं. | विचाराथी निघालेले मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1 | वादीने प्रथमदर्शनी प्रकरण शाबीत केले आहे काय ? | ... नाही .. |
| 2 | तात्पुरता मनाई आदेश न मिळाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... नाही .. |
| ३ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | ... नाही .. |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणेमिमांसा

**मुददे क्रमांक १ ते ४ करीता –**

**०६**. वादीने वादमिळकत दिनांक २७.०८.२०१४ रोजी दस्त क्रमांक १३८८/२०१४ अन्वये खरेदी केली आहे.दस्त नंबर १३८८/२०१४ च्या पान क्रमांक ११ वर वादीने खरेदी केलेल्या क्षेत्राची चतुःसिमा नमूद आहे.

पूर्वेस – गट नंबर १८१ पैकी सौ.ज्योत्सना बाजीराव पाटील यांची उर्वरीत जमीन

पश्चिमेस – मौजे आंबा गावची शीव.

दक्षिणेस – गट नंबर १८० ची सौ.ज्योत्सना बाजीराव पाटील यांची जमीन

उत्तरेस – गट नंबर १९३ ची कोंडीबा गणपत कांबळे यांची जमीन.

या चतुःसिमा व दाव्यामिळकतीमधील चतुःसिमा याचा विचार केला असता पूर्वेकडील चतुःसिमे यामध्ये तफावत आढळून येते. खरेदी खता प्रमाणे पूर्वेस गट नंबर १८१ पैकी ज्योत्सना बाजीराव

पाटील यांची उर्वरीत जमिन असा उल्लेख आहे. दावा मिळकतीत मात्र पूर्वेस गट नंबर २५२ ची मिळकत असा उल्लेख आहे. यावरुन दावा मिळकत व वादीने खरेदी केलेली मिळकत यामध्ये तफावत असल्याचे स्पष्ट दिसून येते. वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली नाही. वादी मागत असलेली तुर्तातुर्त मनाई हुकूम दिल्यास त्याचा गैरफायदा वादी घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रतिवादीचे बिगरशेती प्रक्रिया पुर्ण होवून प्लॉट सॅन्क्शन झाले आहेत. प्रत्येक प्लॉटचा ७/१२ वेगळा झाला आहे. प्रतिवादी ते क्षेत्र् सोडून प्रतिवादीने इतर क्षेत्रात अतिक्रमण करण्याची शक्यता नाही. प्रतिवादींनी अतिक्रमण केल्यास मोजणीदारातर्फे अतिक्रमित क्षेत्र् मोजून त्याबाबत निर्णय घेता येईल यासाठी मात्र् वादीचे क्षेत्र् कोणते व कुठे आहे हे निश्चीत करणे गरजेचे आहे. दाव्याचा कल वादीच्या बाजूने नाही. म्हणून मी मुददे क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुददा क्रमांक ४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**०२.** खर्चाचा आदेश दाव्यासोबत.

सही/-

दिनांक – २७/०६/२०१७

(अ.अ.वाळूजकर )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मलकापूर-शाहुवाडी

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer : S.A.SHINDE
Name of the Court : A.A.Walujkar, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi,

Date of order : 27/06/2017
Order signed by the presiding officer on : 27/06/2017
Order uploaded on : 04/07/2017